म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. १२८८
१९५५

अनुक्रम
विषय
क्रमांक
नों. दि.



# मुग्धा

REFBK-0008708

गांगल : महाजन
पुराणिक : श्रीरंग गुणे
मधुकर पाठक

प्रस्तावना
श्री. वा. रा. ढवळे

★

मूल्य दीड रुपया

२।७।१९५५
९८३८०
विभाग ९२८८
क्रां ३५१.६।५५

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अनुक्रम ९८३८०
विषय म. काव्य
क्रमांक ७२८८०
नों. दि. ३१/८/५५

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८००८

REFBK-0008708
REFBK-0008708

# मुग्धा

का व्य सं ग्र ह

पांच कवि

**विश्वनाथ गांगल**

**शरद महाजन**

**मधुकर पुराणिक**

**श्रीरंग गुणे**

**मधुकर पाठक**

प्रकाशक

सौ. श्यामला कृ. नरवणे
७ नलिनी निवास
माहिम, मुंबई १६

● ● ●

सर्व हक्क लेखकांच्या
स्वाधीन

● ● ●

मुखपृष्ठावरील चित्र
चित्रकार काळेले
जी. डी. आर्टस्

● ● ●

मुद्रक
स. पां. जोशी
समर्थ प्रेस, ठाणे

● ● ●

किंमत रु. २

## अनुक्रमणिका


**वि. उ. गांगल**

| | | | |
|---|---|---|---|
| मुग्धा | ... | .... | ५ |
| नशा | ... | ... | ६ |
| रेखिव लेणें | ... | ... | ७ |
| सोवळी | ... | ... | ७ |
| कुणी मुशाफिर | ... | ... | ८ |
| शान्ति | ... | ... | १० |
| लोकल गाडी | ... | ... | १३ |
| राजमार्ग | ... | ... | १६ |

**श. दा. महाजन**

| | | | |
|---|---|---|---|
| सरल्या या वर्षाची | ... | ... | १९ |
| तुझ्या प्रीतिचें चंदन जळले | | ... | २१ |
| प्रीति | ... | ... | २२ |
| येतां तव सन्निध मी | ... | ... | २३ |
| येशील तूं | ... | ... | २५ |
| जलाशयांतील नितळ जलावर | | ... | २७ |
| सोडतांना सोडवेना | ... | ... | २९ |
| ये उजळित ममहृदयीं | ... | ... | ३० |

म. प्र. पुराणिक


| | |
|---|---|
| संमोहन ... ... | ३१ |
| इतिहासाच्या पर्णावरती ... ... | ३२ |
| स्थिरलेला जीवभाव ... ... | ३३ |
| अजून ... ... | ३४ |
| सुनिर्मल जळांतली ... ... | ३५ |
| दिवास्वप्न ... ... | ३६ |
| खुळाच मी .... ... | ३८ |
| मी घुसळण घुसळित असतां ... | ४० |


श्रीरंग गुणे .... ...


| | |
|---|---|
| आज खुणेची— ... ... | ४१ |
| आतां वाटतें ... ... | ४४ |
| मोट सोडिचा वखुत जाहला ... | ४६ |
| फिरणार न आता .... ... | ४८ |
| हे जलवन्ति ... ... | ५० |
| भाव कहाणी ... ... | ५२ |
| अशी झाली भेट ... ... | ५६ |


मधुकर फाटक


| | |
|---|---|
| किनारा ... ... | ५७ |
| मनांत माझ्या शरद वितळला ... | ५९ |
| आस ... ... | ६१ |
| तूं ... ... | ६३ |
| असह्य हो ... ... | ६५ |
| कधीं कधी ... ... | ६७ |
| वेडा होईन ... ... | ६९ |
| तुझिया चरणीं ... ... | ७० |


४४१७/८८

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# प्रास्ताविक

गेल्या वीस वर्षांच्या कालावधींत मराठी कवितेनें प्रकाश-पूजनापासून जीवनांतील वैफल्यपूजेपर्यंत व मुक्तछंदापासून तों मुक्तकाव्यापर्यन्त अनेक वळणें आडवळणें घेतलेलीं आहेत. या काळांत काव्यांतील आशय फारसा बदलला नसला तरी अभिरुचि व अभिव्यक्ति यांच्या बाबतींत बरेंचसें नावीन्य निर्माण झालें आहे. विशेषतः इ. स. १९३५ नंतर कुसुमाग्रज, बोरकर, इन्दिरा, मर्ढेकर, पु. शि. रेगे, विन्दा करंदीकर व पाडगांवकर इत्यादि कवींनीं आपल्या वैशिष्ठ्यपूर्ण काव्य-निर्मितीनें मराठी कवितेंत एकप्रकारचें नवचैतन्य ओतलेलें आहे. नव्या प्रतिमा, नवीं प्रतीकें काव्यांत वापरून आपल्या मनांतील आशय, भावोर्मी, विचारोर्मी जशा त्यांनीं नवीन घडणींत ( Pattern ) रसिकांपुढें ठेविल्या त्याचप्रमाणें जुन्या संकेतांच्या ऐवजीं नवीन संकेत काव्यांत आणून रसिकांच्या विचारशक्तीला व भावशक्तीलाहि चालना दिलेली आहे. पुष्कळसे अनुभव व अनुभववाहक शब्द हे दोन्ही सर्वसामान्य वाचकांना अपरिचित असल्यामुळें, वाचकाच्या दृष्टीनें काव्यांत अर्थदुर्बोधता निर्माण होणें ही गोष्ट अपरिहार्य होती. पण दुर्बोधता ही नवीन कवितेचें व्यवच्छेदक लक्षण आहे असें जेव्हां आवर्जून सांगितलें जाऊं लागलें, त्यावेळीं नवीन काव्य समजण्यापेक्षा उलट त्या काव्याबद्दल बरेचसे गैरसमजच निर्माण होण्यास मदत झाली. अमुक एक प्रकारची कविता तीच खरी कविता, बाकीची कविताच नव्हे असेंहि सांगण्यानें जुन्या कवितेलाच नव्हें तर एकंदर काव्यमूल्यांनाहि अन्याय झालेला आहे. पण तो एक स्वतंत्र चर्चेचा विषय असल्यामुळें येथें फक्त त्या विषयाचा नामनिर्देश करूनच पुढें जाणें इष्ट आहे.

गेल्या दहा वर्षांत मराठींत निर्माण झालेल्या काव्याचेच आदर्श प्राधान्येंकरून प्रस्तुत संग्रहांतील कवींच्या पुढें असावेत हें त्यांतील कांहीं स्पष्ट-अस्पष्ट खुणांवरून कळून येण्यासारखें आहे. वयानें वीस ते तीसच्या दरम्यांत असलेले कल्याणचे हे प्रस्तुत पांच कवि केवळ काव्याच्याच ओढीनें

एकत्र आलेले आहेत. त्यांच्यापैकीं कांहीं पदवीधर असून शिक्षक आहेत. कांहीं कॉलेजांत शिकत आहेत, तर कांही स्वतंत्र व्यवसायांत व नोकरींत आहेत. आठवड्यांतून कटाक्षानें एकदा तरी एकत्र यावें व काव्यवाचन व काव्य-चर्चा करावी हा या कवींचा गेल्या कित्येक दिवसांचा क्रम आहे. या कवि—मंडळाला कोणत्याहि अर्थानें नांव नसलें तरी रवि-किरण मंडळासारखेंच या मंडळाचें ठोकळमानानें स्वरूप आहे. पांच कवि एकत्र आले म्हणजे महाकाव्य निर्माण करतां येईल अशी या कवींची समजूत नाहीं. व्यक्तीच खरें काव्य निर्माण करूं शकतें, समूह तें करूं शकत नाहीं, याची जाणीव या कवींना आहे. त्यामुळेंच, आपल्या नवीन कविता दुसऱ्यांना वाचून दाखवाव्या व दुसऱ्यांच्या ऐकाव्या व त्यांतील गुणदोषांची स्वतःच्या मगदुराप्रमाणें चर्चा करावी, हें माफक उद्दिष्टच डोळ्यांपुढें धरून हे पांच कवि एकत्र आले आणि आज आपल्या कांहीं निवडक कवितांचा संग्रह रसिक वाचकांच्यापुढें ते भीतभीतच ठेवीत आहेत. 'मुग्धा' हें त्यांच्या काव्य-संग्रहाचें नांव त्या दृष्टीनें अन्वर्थक वाटतें.

आपल्या नित्याच्या जीवनांत केवढी काव्यात्मता असूं शकते याचें प्रत्यंतर प्रस्तुत काव्यसंग्रहांतील कविता डोळ्यांखालीं घालून सहज येण्यासारखें आहे. कविता म्हणजे आपल्या नित्याच्या जीवनापासून निराळा असलेला एक कृत्रिम व बौद्धिक ' प्रयोग ' ही समजूत आतां सुदैवानें मागें पडली आहे. आपण जें नित्याचें जीवन जगत असतों, त्याच्याकडेच एका कलात्मक वेगळेपणानें पहाण्याची जी दृष्टि तीच काव्य-दृष्टि. ही दृष्टि ज्याला साधली तोच कवि. पूर्वीच्या काळीं कवि व काव्य यांच्याबद्दल पुष्कळ अवास्तव व अतिवास्तव कल्पना रूढ झालेल्या आढळून येतात. त्या आतां पार बदलून गेल्या आहेत, हें सुदैव म्हटलें पाहिजे.

नित्याच्या जीवनांत हरघडी अनुभवाला येणाऱ्या दृश्यांतून अगर प्रसंगांतूनच प्रस्तुत संग्रहांतील बरेंचसें काव्य निर्माण झालेलें आहे. विषय तेच, जीवनहि तेंच पण त्यांच्याकडे पहाण्याच्या दृष्टींतील नावीन्यामुळें काव्य हें नवीन वाटत असतें. वर्णनांतील नावीन्यामुळेंहि काव्यांतील नवखेपणाची जाणीव होते. प्रस्तुत संग्रहांत सुरवातीलाच ज्यांच्या कविता छाप-

लेल्या आहेत त्या श्री. गांगल यांच्या कवितांचे विषयहि तसे जुनेच आहेत. पण ते जेव्हां—

दारीं लागते चाहूल
पडे पुढती पाऊल
परी दुजें मागें जाय
होय ताजव्याचा देह !

असें 'मुग्धे'चें कल्पकतेनें वर्णन करतात त्यावेळीं मनाला नकळत अपरिमित आनंद होतो.

श्री. गांगल यांचें शान्तिदूतांचें पुढील वर्णन पहा.

माणसांच्या प्रेतांचे खच पडून
युद्ध समाप्ती होते
तेव्हां
शांतीचे दूत
शांतीचीं गीतें गातात !!!

या वर्णनानें शांति-दूतांचा मार्मिक नि मर्मभेदक उपहास मोठ्या कौशल्यानें करतांना ते आढळून येतात.

'कुणी मुशाफिर' आणि 'लोकल गाडी' या दोन कवितांवरून गांगलांचें सूक्ष्म नि भेदक निरीक्षण, सामर्थ्यपूर्ण शब्द-रचना व उपहासगर्भ वर्णन-पद्धति जशीं दिसून येतात, त्याचप्रमाणें 'राजमार्ग' या कवितेवरून अचेतनाला सचेतन करण्याच्या त्यांच्या वर्णनशक्तीचेंहि प्रत्यंतर येतें.

संग्रहांतील दुसरे कवि श्री. महाजन यांच्या काव्यांतील शब्दसौष्ठव व ओजयुक्त वर्णनपद्धति उल्लेखनीय आहे. श्री. महाजन यांना कॉलेजचें शिक्षण घेण्याची संधि मिळालेली असून, त्यांच्या कांहीं कविता कॉलेजच्या नियत-कालिकांत प्रसिद्ध होत आल्या आहेत. त्यामुळें कदाचित् त्यांची शब्दरचना सरावानें थोडी प्रगल्भ व ओघवती व्हावी हें साहजिक होय.

सरत्या या वर्षाची
सरणारी सांज आज
नवथर जणुं गर्भवती
माहेरा दूर जाय !

हें संध्येचें वर्णन असो किंवा

तुझ्या प्रीतिचें चंदन जळलें
स्वप्नांचे अवशेष राहिले
त्या स्वप्नांच्या अवशेषांतुन
गीत मनोहर माझें उरलें !

हें प्रीतीचें स्तोत्र असो, त्यांची प्रतिभा कल्पकतेचें उदात्त स्वरूप घेऊन शब्दरूप होते. श्री. महाजन यांच्या मनाला प्रीति-भावनेचें उत्कट आकर्षण असावें हें साहजिक असलें तरी

दाहक ही प्रीति खरी
जाळित अन् जळत असे
ज्वलनांतिल दाहकता
जळतांना कळत नसे

या प्रीतीच्या वास्तव स्वरूपाकडे, त्यांचें दुर्लक्ष झालेलें नाहीं हें विशेष होय. 'येतां तव सन्निध मी' या कवितेंत प्रीतीचें अद्वैत वर्णन करतांनाहि, मांगल्याचा विसर त्यांना पडत नाहीं. त्याचप्रमाणें सखीच्या आगमनाची उत्सुकतेनें वाट पहाणारें त्यांचें स्वप्नाळू मन भोंवतालच्या उदात्त वातावरणातच रंगलेलें असतें. त्यांच्या प्रतिभेला निसर्गाचेंहि आकर्षण आहे, याचें प्रत्यन्तर 'जलाशयांतिल नितळ जलावर' या कवितेवरून आल्याशिवाय रहात नाही. बिजलीचें गीत गात ये, हें आवाहन ते नेमकें कोणाला करीत आहेत हें जरी स्पष्ट होत नसलें तरी तें आवाहन ऊर्जस्वल आहे, हें अमान्य करून कसें चालेल ?

भूतपूर्व जीवनाच्या मधुर स्मृतीची आठवण होऊन श्री. पुराणिक काय अगर श्री. श्रीरंग गुणे काय दोघेहि कवि विव्हल होतांना दिसून येतात. श्री.

पुराणिक यांच्या काव्याचे विषय तसे विविध आहेत असें नाहीं. क्षणिक मोहाला बळी पडून पतीच्या आधीन होणारी पत्नी, जिच्या गौर तनूचा मस्त मोगरी सुगंध जिवाला धुंद करतो अशी प्रेयसी, चंद्रिकेनें चमकणारी जलवाहिनी, जिच्या सुरेल गायनाची व पदन्यासाची उत्कंठा लागून राहिली आहे अशी मस्तानी, दिवसभर कष्टाची नोकरी करून घरीं आल्यावर संसारांत रमणारा कारकून हे पुराणिकांच्या काव्याचे विषय आहेत.

अजून येतो मस्त मोगरी
सुगंध तुझिया गौर तनूचा
अजून स्मरतो मधुर मनोरम
स्रोत आगळा रसवंतीचा

या जुन्या आठवणींतच रममाण झालेल्या पुराणिकांना भोंवतालच व्यापक विश्व दिसूं नये हें साहजिकच होय. इतकेंच नव्हे तर—

गिरीकंदरीं सागरतीरीं
अथवा जेथें नसेल कोणी
विसरावें मी जगता अवघ्या
गोड तुझ्या मग सुरेल गानीं

हा त्यांचा प्रकृति-धर्मच दिसतो. गुंग अगर धुंद होण्यामुळेंच कदाचित् कलात्मक वेगळेपणा ठेवणें त्यांना जमत नसावें. कल्पकतेची देणगी नसली म्हणजे धुंदी अगर गुंगी ही उत्कट असूनही सृजनशील होऊं शकत नाहीं.

श्री. श्रीरंग गुणे यांची कविता प्रकृतीनें रविकिरण मंडळाच्या किंबहुना त्याच्याहि अगोदरच्या काव्याला जवळची वाटावी असें तिचें स्वरूप आहे. वर्णनपर रचना हें त्यांच्या काव्याचें एक वैशिष्ट्य सांगता येईल. दुष्यंतानें दिलेली खुणेची आंगठी हा पौराणिक विषय त्यांच्या कवितेचा विषय व्हायला कांहींच हरकत नाहीं. पण त्याचें पारंपारिक वर्णन करण्यांतच त्यांची प्रज्ञा सुखावते यावरून त्यांच्या कवितेचें स्वरूप स्पष्ट होण्यासारखें आहे. प्रीति लज्जासंकुल राहिल्यामुळें झालेला पश्चात्ताप, परस्परांशीं मन मोकळें करून बोलण्याची संधि मिळत नाहीं म्हणून

व्याकुळचित्त होणारें खेड्यांतलें जोडपें, प्रेयसीची पुन्हा भेट होणार नाहीं म्हणून व्याकुळणारा प्रियकर, वर्षागान वगैरे त्यांच्या काव्याचे विषय हे कांहीं नवीन नाहींत, जुनेच आहेत. त्यांची मांडणीहि जुन्या निबंधी थाटाची. त्यामुळेंच त्यांच्या भावगीतांचें स्वरूप हें तांबे अगर यशवंत, गिरीश यांच्या भावगीतांसारखेंच व्हावें हें क्रमप्राप्तच होय. उदाहरणार्थ—

सहवासीं नच कळते पारख
परी वियोगें लागे रुखरुख
अतां वाटतें (व्यर्थच वाटुन)
दिलादिलांची होती ओळख

या पश्चात्ताप- गीतांतील ओळी घ्या, अगर

इचार कसला मनांत घुसला
दिठींत अपुल्या कसली घुटमळ ?
ओठ हालतां नजर ढळे कां ?
काळजांत ग कसली खळबळ ?

या जानपद- गीतांतील प्रश्न घ्या. त्यांची सारी काव्यरचनाच रविकिरण मंडळाच्या काव्याची आठवण करून देते.

श्री. मधुकर पाठक हे या संग्रहांतले शेवटचे पण काव्य-गुणांच्या दृष्टीनें अधिक महत्त्वाचे किंबहुना अग्रेसर कवि आहेत. आशयाचा कलात्मक व सौंदर्यपूर्ण आविष्कार, भावनांची उत्कटता, कल्पनारम्य वर्णनशैली, सफाईदार रचना, या काव्य-गुणांमुळें त्यांची कविता ही प्रस्तुत पांच कवींत उठून दिसते यांत शंका नाहीं. क्वचित् मर्ढेकर व पदोपदीं कुसुमाग्रज यांची आठवण यावी इतकी बेमालूम कल्पनारम्यता, काव्यात्मकता, भाषेची सफाईदार रचना, श्री. पाठक यांना साधलेली आहे.

किति काळ पहुडला योग्यासम निःशांत
निःशब्द अचेतन निर्विकार निःसंग
तो आज किनारा चळला, ढळली शांति
हृदयांत दाटले आज विवेक-तरंग

या ओळी पाठकांच्या वर्णनकौशल्याची साक्ष देतात. तर–

मनांत माझ्या शरद वितळला
अवघे तनुकण गेले उजळुन
कोनां कोनांतुनी दाटल्या
दाहि दिशांच्या कक्षा चमकुन

यांतील कल्पना-रम्यता रसिक वाचकांच्या मनांत सुखसंवेदना निर्माण करतात.

सखीच्या आगमनासाठीं उत्सुक झालेलें त्यांचें मन किती उत्कट व कल्पक बनतें तें पुढील ओळीवरून पहाण्यासारखें आहे.

ग्रीष्माचा तप्तदाह
हो असह्य हृदयदाह
ओतित ये, सिंचित ये, जलदांच्या पखाली
लागली तुझीच ओढ
गात गीत गूढ गोड
ये क्षणांत जीवनांत पाजळीत शर्वरी

अनुभवांतील जिवन्तपणामुळें येणारी उत्कटता व कल्पनारम्यता त्यांच्या काव्याचें एक उल्लेखनीय वैशिष्ठ्य आहे.

भावकोमल व सौंदर्यपूर्ण वर्णनाचा नमुना पहायचा असेल तर पाठकांच्या, प्रेयसीच्या आगमनाचें वर्णन करणाऱ्या, पुढील ओळी पहाव्या.

कधीं कधीं होऊन चांदणें
अंधारांतुन येत असे तूं
झुळुक वायुची होउन आणिक
मला सदा फुलवीत असे तूं

रात्रीचें किती कलात्मक, नि कल्पनारम्य वर्णन पाठक करूं शकतात याचा पडताळा पुढील ओळींवरून घेतां येतो.

विरुनी गेल्या लांब सांवल्या
पुसलीं गेलीं उन्हें कोंवळीं
अंधाराची ध्वजा नाचवित
हळूं पातली रजनी काळी !

रात्रीच्या या काळोखांत मनांतील हुरहुरीमुळें जीव कसा बेचैन होतो याचें हुबेहुब चित्रण पाठकांनीं पुढील ओळींत रेखाटलें आहे.

राहे मनिंच्या घुमटामध्यें
अशीच भरुनी मुग्ध आर्तता
असह्य होई सारें जीवन
असह्य हो ही गूढ शान्तता !

पाठकांच्या कवितांतून अशा किती तरी ओळी निवडतां येण्यासारख्या आहेत. पण तसें करण्याऐवजीं रसिक वाचकांनीं संग्रहातील त्यांच्या मूळ कविताच वाचणें अधिक इष्ट होईल. प्रेममीलनासाठीं आतुर झालेली प्रियकर-प्रेयसी यांचीं उत्कट भाव-चित्रें रेखाटण्यांत त्यांची बरीच कविता खर्ची पडलेली आहे. त्यांची प्रतिभा जर जीवनाच्या ओघांत सर्वस्पर्शी होऊं शकली तर पाठकांच्याकडून उत्तरोत्तर अनुभूतींच्या विविध क्षेत्रांतील उत्कट कल्पनारम्य चित्रणाची अपेक्षा करायला हरकत नाहीं.

प्रस्तुत संग्रहातील कवींच्या काव्यांतील सर्वच सौन्दर्यस्थळांकडे अंगुली-निर्देश करतां आलेला नाहीं. पण प्रत्येकाचें वैशिष्ट्य चटकन ध्यानांत यावें अशा रीतीनें प्रास्ताविकांत त्यांच्या काव्यगुणांचा उल्लेख करण्यांत आलेला आहे. कविता संग्रहित करण्याच्या अगोदर काव्यदोष काढून टाकण्याच्या दृष्टीनें मी ज्या सूचना केल्या होत्या त्यांचा कवींनीं स्वीकार करूनहि कांहीं दोष अभावितपणें राहिले आहेत. पण त्यांच्याकडे रसिक वाचकांनीं सहानु-भूतीनें पहावें एवढेंच मी सुचवूं शकेन. किंबहुना—

अङ्गुली,
कठिण लागली,
तरी संपली.
हळुंच या शिवणें
कुस्करूं नका हीं सुमनें !

या कविवर्य तांबे यांच्या शब्दांतच रसिकांना विनंती करणें अधिक बरें असें मला वाटतें.

'मुग्धे' चें सौन्दर्य हें आगळेंच असतें, हें जरी खरें असलें तरी प्रस्तुत संग्रहांतील कवींची कविता उत्तरोत्तर अधिक बोलकी व्हावी व तिच्या निर्मात्यांचा बोलबाला महाराष्ट्रांत दूरवर व्हावा ही अपेक्षा बाळगून हें प्रास्ताविक संपवितो. ● ● ●

मुंबई, वा. रा. ढवळे
८-४-१९५५

# निवेदन

रसिकहो !

काव्यसंग्रहाच्या रुपानेंच आपणासमोर आम्ही येत आहोंत. कांहींशा आनंदाच्या व कांहींशा भीतीच्या संमिश्र भावनेनें मन हेलावत आहे. सौंदर्यसमीक्षक दृष्टीचा रसिकच वाङ्मयीन कृतीचें मूल्यमापन करूं शकतो. आशा आहे कीं आपण प्रस्तुत संग्रहांतील काव्याचें स्वागत कराल.

आमच्या विनंतीस मान देऊन ख्यातनाम साहित्यिक श्री. वा. रा. ढवळे यांनीं आपला अमूल्य वेळ खर्चून प्रस्तावना लिहिली व आम्हाला वेळोवेळीं अचूक मार्गदर्शन केलें, त्याबद्दल त्यांचे आम्ही सदैव ऋणी आहोंत. चित्रकार श्री. काळेले यांनीं मुखपृष्ठावरील रेखन आमच्या कल्पनेप्रमाणें अल्पावधींत तयार करून दिलें त्याबद्दल त्यांचे व वेळोवेळीं ज्यांनीं ज्यांनीं सहकार्य दिलें त्या सर्वांचे आम्ही आभारी आहोंत. त्याचप्रमाणें अत्यंत अल्प मुदतींत मुद्रणाचें काम सुबक आणि व्यवस्थित केल्याबद्दल श्री. स. पां. जोशी, संपादक 'सन्मित्र' व त्यांचे सहकारी यांचे व सौ. शामला कृ. नरवणे मुंबई, यांनीं प्रकाशनाची जबाबदारी सांभाळल्याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच !

आपले,

**विश्वनाथ गांगल,**
**शरद महाजन,**
**मधुकर पुराणिक,**
**श्रीरंग गुणे,**
**मधुकर पाठक.**

प्रकाशन स्थळ
मुंबई व उपनगर साहित्य संमेलन,
**डोंबिवली.**
दि. १०-४-१९५५.

**वि. ऊ. गांगल**

# मुग्धा—

दारीं लागते चाहूल
विचारांचा जाई तोल
परिसुनी शब्द कान
संभ्रमीत माझें मन १

दारीं लागते चाहूल
पडे पुढती पाऊल
परी दुजें मागें जाय
होय ताजव्यांचा देह ! २

भावनांच्या जीवनानें
विचारांचा फुले तरु
मुग्ध सायली लाजली
थबकली मूक कळी ! ३

# नशा—

रात्र पंख लावून उडते
तेव्हां उनाड चिमण्या
उबेसाठीं तडफडतात
आणि अगतिक कोलाहल करतात.
निशेच्या अंधुक प्रकाशांत
त्यांच्या भडक चोचीं चमकतात
तेव्हां फसफसणारं नश्वर जग
अधिरतेच्या स्वाधीन होतं
आणि गात्रांतिल धमक
आवेशाविना लुळी पांगळी होऊन
अंधारांत उंचवटे चांचपडीत
ओरबाडीत—अडखळत
शिळं सुख चघळत बसते
आणि निशेची नशा--
अंधारांत वाढत जाऊन
लुप्त होते—
प्रकाश पडूं लागला म्हणजे ! !

## रेखिव लेणें—

शरद्‌ऋतूच्या पहांटकाळी
अवघडलेलीं दोन पांखरें
मिट्ट होउनी असता बसलीं
धुंद वाटते चोरुनी बघणें—
दो गोलांतिल रेखिव लेणें ! !

## सोवळी—

कशास होशी इतुकि सोवळी
दो कुंभांची संगत जुळली
कमान झुकता इन्द्रधनुचीं
तिथेच फुटली यौवन प्राची
नकळत चळली बघ मासोळी
जेव्हा रुतते उरिं कांचोळी
आज उद्या नां होशिल भोळी
कशास होशी इतुकि सोवळी !

# कुणी मुशाफिर-

कुणी मुशाफिर,
बंद पथांतिल-
मंद मतीनें-
कुंद दिपाच्या-
कडे निरखुनी
खुशींत हंसतो.
मुक्त शिळेंतुनी
नाक्यावरच्या
साउलीमध्यें
साद घालतो.
कुणी मुशाफिर
धगधगणाऱ्या
गात्रिं, उबविण्या
नकळत त्याच्या
दिशेंत-शिरतो.
लकलकणाऱ्या
छचोर नेत्रीं
ढळलेल्या पदराप्रति
कटाक्ष फेंकुनी
खुशीत हंसतो.

पहिल्या वहिल्या
अल्प प्रयत्नीं
समाधानी तो
कुणी मुशाफिर—
पहिला, दुसरा.
आणिक तिसरें
सौद्यामधलें
खुळखुळणारें
एकच नाणें—
ताल धरुनी
पुन्हां पुन्हां तें
गात बैसतें
छिनाल गाणें.

---

# शान्ति ! --

रक्ताळलेले हात
काळ्या भेसूर रात्रींत
जेव्हां—
मरणाला आव्हान देतात
तेव्हां
शांतीचे दूत
भयानक प्रेतांच्या
अंवती-भंवती
कानोसा घेत
रेंगाळत असतात ! !

लखलखणारे खुनशी डोळे
ओठाला मुरड घालून
जेव्हां—
कर्दनकाळालाही
लाजवितात
तेव्हां—
मृतांच्या भूताभोंवतीं
शांतीचे दूत
वाऱ्यावर
डुलत असतात ! !

वखवखणारीं
राक्षसी शस्त्रें
जेव्हां—
उन्मत्तपणें
म्यानांतून बाहेर पडतात
तेव्हां—
शांतीचे दूत
थडग्यांत गात असतात ! !

अमानुष सत्ता
जेव्हा जुलुमाची
परमावधी करून
रक्ताच्या चिळकांड्यांत
नहात असते
तेव्हां
शांतीचे दूत भेकडपणें
भूतांसारखे
कोपऱ्यांत
रडत असतात ! !

युद्धाची
धुमश्चक्री सुरू होते
आणि

अनुक्रम ९६३.६०
विभाग
क्रमांक ९२८८
नों. दि.

माणसांच्या प्रेतांचे खच पडून
युद्ध समाप्ति होते
तेव्हां--
शांतीचे दूत
शांतीचीं
गीतें गातात !!!

---

# लोकलगाडी–

धडधडणारी लोकलगाडी
कधीं न येई वेळेवरती
गुदमरणारें किता उतारूं
कुशींत घुसती हबकत–भांडत !
फलाटावरी घुटमळणारें
वेळेवरती पेंगत होते–दचकत होतें,
धडधडणाऱ्या गाडीमाजीं
जागेसाठीं आतुर होते–फितुर होते !!
फडफडणाऱ्या–चाफडणाऱ्या
दीर्घ स्वरावरी– बोल फुंकाचें
नाचत होते– फसवित होते––
जनसमुदाया खुळावित होते !!
लगबगणाऱ्या अधरावरती
शब्द मृदू ते हळूंच रुळती
प्रातःकाळीं कुजबूज अशी
फारच थोडी कानावरती–नांवापुरती !
अर्धनग्न ती आंग्ल षोडशा
आवरुनिं चाले खुशींत परकर
नकळत मारून फाजिल धक्की
तिरळा डोळा फिरतो गरगर–!!

गाडी येऊनी स्थळीं धडकली
सिंधकन्यका अशाच बसल्या
कवाडांतूनी गोऱ्या--मोऱ्या
कृत्रिमतेच्या थराळाऊच्या !
मानेवरच्या कुंतलांतल्या
गुंतवळाच्या बटा काढूनी
केशभुषेस्तव घाइत गुतल्या !
छळ रात्रींचा जणूं भासतो
अंगावरती यांच्या उतला !!
तलम मुलायम वस्त्र तोकडें
आवरलेली बोथट बोंडे
संस्कृतिचा अन् श्वासच कोंडे
देखुनी अैशी मानव धेंडे !
क्रियेवांचूनी- उपभोगाची·
काय चालते इथें मिजाशी !
बळेंच ढळला पदर कुठेंतरी
सहजतेचा साज नावरी
कांहिच नाहीं-सहज खरोखर
नित्याचा तो कार्यक्रम बरं !
सजीवतेला साज आणण्या
निर्जिव भुकटी मुखास फांसुन

असकाण मारिती बाजुस धक्का
गाडिस बसला हळूंच हिसका--!
धडधडली क्षणीं लोकलगाडी
फलाट सोडुनि निर्जिव ती जरि
कुशींत मारुनी सारे बछडे
धांवत होती लोकलगाडी

---

गाडी येऊनी स्थळीं धडकली
सिंधकन्यका अशाच बसल्या
कवाडांतूनी गोऱ्या--मोऱ्या
कृत्रिमतेच्या थराखालच्या !
मानेवरच्या कुंतलांतल्या
गुंतवळाच्या बटा काढूनी
केशभुषेस्तव घाइत गुतल्या !
छळ रात्रींचा जणूं भासतो
अंगावरती यांच्या उतला !!
तलम मुलायम वस्त्र तोकडें
आवरलेली बोथट बोंडे
संस्कृतिचा अन् श्वासच कोंडे
देखुनी अशी मानव धेंडे !
क्रियेवांचूनी- उपभोगाची·
काय चालते इथें मिजाशी !
बळेंच ढळला पदर कुठेंतरी
सहजतेचा साज नावरी
कांहिच नाहीं-सहज खरोखर
नित्याचा तो कार्यक्रम बरं !
सजीवतेला साज आणण्या
निर्जिव भुकटी मुखास फांसुन

असकाण मारिती बाजुस धक्का
गाडिस बसला हळूंच हिसका--!
धडधडली क्षणीं कोकलगाडी
फलाट सोडुनि निर्जिव ती जरि
कुशींत मारुनी सारे बछडे
धांवत होती कोकलगाडी

---

# राजमार्ग--

नतमस्तक पदिं करुन अवनिच्या
राजमार्ग हा इथें पहुडला.
बगल देउनी हुदडत गेला—
प्रासादांना घालुन वेढा.
चुंबुन चळका नदी किनारीं
जातां जातां मिचकुन डोळा
वळणावरती वळून बघतो
भाव कोवळा अगतिक भोळा.
चार दिशांतून चार गौळणी
झुलवित आल्या कुंभ कटीवर
पूर्व दिशेला नहात होती
उषा गुलाबी लाजुन--उपवर.
शय्येवरुनी नुकती उठकी
तिथेंच थबके पश्चिम लाजुन
सुवर्ण वसनें नेसत पाहुन
गौरकाय मृदु कांतिस मोहुन.
वायु उधळुनी मादक माया
हस्तिदंति मनमोहक किमया
जरा घुटमळे राजपथांतरिं
स्वप्न देखण्या खिळला क्षणभरि.

संध्यासमयीं थकोकल्या त्या
जळीं विरहल्या मुग्ध साउल्या
स्नान उरकुनी हळूंच वळल्या
स्वप्न देखण्या पूर्व दिशेला !
ओढ मनींची घेउनि वळला
राजमार्ग मग पुढें जरासा
वळतां वळतां क्षणभर खिळला
अवखळ अस्फुट भाव तरळला !
बंध मनींचा उसळुन-- फुलका
क्षणीं अधरिच्या चुंबनि रमला
नकळत घालुन मोहमयी मृदु
पुष्करणीच्या कटीस विळखा !
झाली मनिंची ओढ अनावर
अभ्यंतरि अन् उठलें काहुर
कचपाशांतिल हुंगि केवडा
स्पर्शुन हिरवा रेशमी चुडा !
भरजरि केउन सुवर्ण शालू
पूर्व दिशेंतुन गौळण हंसली
गालीं फुलली तिच्याहि लाली !
पाहुन त्याची रास क्रिडा ही.

उत्तरियाशीं करीत चाळा
गंधवती ही उभी उत्तरा
विलोल नयना हळूच वदली
पहा दक्षिणे पूर्व दिशेला !
चार गौळणी पाहुन जमल्या
चार दिशांतुन खट्याळ मेल्या
मनीं विरमला लाजुनि वळला
राजमार्ग मार्गस्थ जाहला !!

---

कवि– श. दा. महाजन

# सरत्या या वर्षाची

सरत्या या वर्षाची
सरणारी सांज आज
थबकत् अन् रेंगाळत
उचलितसे पाउलास !!
सरत्या या वर्षांच्या
गोड, कटू आठवणी
घेउनिया पाठींशीं
जात असे पैलतिरीं !!
सरत्या या वर्षाची
सरणारी सांज आज
नवथर जणुं गर्भवती
माहेरा दूर जाय !!
सरत्या या वर्षाची
सरणारी सांज आज
पाहतसे वळुनि पुन्हां
नकळत कां हो उदास ?
दुरावत्या वर्षांच्या

विरहानें व्याकुळली
सरत्या या वर्षाची
सरणारी सांज खुळी !!

सरणाऱ्या वर्षातुन
येइल नव वर्ष उद्यां
क्षणभरच्या विरहांतच
पूर्तीचा हर्ष उद्यां !!

विकलगात्र होय जरी
नयनांतुन नव आशा
प्रस्फुरतें गीत नवें
छेदितसे अवकाशा !!

येत्याच्या जाणिवेंत
मोहरुनी अंग अंग
रेंगाळत दूर जाय
सरणारी सांज आज !!

---

# 'तुझ्या प्रीतिचें चंदन जळले'

तुझ्या प्रीतिचें चंदन जळकें
गंध अजुनही मनिं दरवळतो
लोभसवाण्या स्मृति वलयांतुन
सुखद क्षणांचें पूजन करितों !!

तुझ्या प्रीतिचें चंदन जळलें
धुंद सुवासें मन्मन झालें
त्या धुंदींतुन पार्थिवतचें
पाश कधींचे विरून गेले !!

तुझ्या प्रीतिचें चंदन जळलें
भाव तयांनीं नव पालवलें
त्या भावांतुन नकळत तुजवर
अश्रू मौक्तिक मी उधळीलें !!

तुझ्या प्रीतिचें चंदन जळकें
स्वप्नांचे अवशेष राहिले
त्या स्वप्नांच्या अवशेषांतुन
गीत मनोहर माझें उरलें !

तुझ्या प्रीतिचें चंदन जळकें
प्रसन्नतेचें हास्य उमलकें
त्या हास्यांतिल उदात्ततेनें
माझें अंतर पावन झालें !!

दा. क्र. ८००८

# प्रीति–

ज्योतीवर जळण्यास्तव
    शलभांचा जन्म असे
प्रीतीस्तव मरण्याचें
    अविरत हें वेड असे !!
प्रीतीचें आकर्षण
    दिलखेंचक धुंद असे
परिणति परि मीलनांत
    जळण्यानें होत असे !!
दाहक ही प्रीति खरी
    जाळित अन् जळत असे
ज्वलनांतिल दाहकता
    जळतांना कळत नसे !!
ज्योतीस्तव जळण्याचा
    शलभांना शाप असे
प्रीतीची दाहकता
    कळते परि वळत नसे !!
ज्योतीची प्रखर प्रभा
    तिमिराला उजळितसे
तेजांतिल सामर्थ्यीं
    शलभांचे हवन असे !!
प्रीती ही धगधगती
    तेजमयी ज्योति प्रखर
पूर्तींतिल ज्वलनानें
    साधक तो होय अमर !!

# येतां तव सन्निध मीं–

येतां तव सन्निध मीं
दर्शन तव मज घडलें
दृष्टींतुन तुझिया मज
अमृत तें सांपडलें ! !
अवलोकुन प्रेमामृत
आनंदित मी झालें
आणि नव्या उत्साहे
हृदयीं तें सांठविलें !!
तव वदनीं मंगलता
पाहुन मन फुललेलें
नकळत तें माझें–पण
विसरुनिया मी गेले !!
थरथरल्या भावनेंत
गीत नवें आळविलें
तोडुनिया बंधन तें
समिप तुझ्या रे आले !!
माझें–पण गेलेलें
तुजविण ना उरलेलें
सहवासीं तुझिया मम
भावपुष्प फुललेलें !!

भावसुमन फुलकेलें
गंधित जग झालेलें
गंधित त्या वलयांतुन
रंगरूप सांकळकें !!
रंगरूप सांकळकें
भासांकित मी झालें
पाहुनिया एकात्मक
क्षणभर मी गोंधळकें !!
तुझियांतच मी आहें
माझ्यांतच तूं राहे
नवथर त्या स्वप्नांनीं
कळलेकें आहे हें !!

---

# येशिल तूं–

सखि येशिल तूं–
नादाउन,
भाराउन
वेडाउन
स्वप्नांच्या
राज्यांतुन ! !

सखि येशिल तूं–
प्रश्नेंतुन,
हृदयांतिक
सरितेंतुन,
भावांच्या
नौकेंतुन ! !

सखि येशिल तूं–
तिमिरांतुन,
तडितेच्या
जोषांतुन
अनिलाच्या
गीतांतुन ! !

सखि येशिल तूं--
झेंपाउन
प्राचीच्या
हास्यांतुन
फुलणाऱ्या
सुमनांतुन !!
सखि येशील तूं--
साकारून
स्फूर्तीच्या
कैफांतुन,
प्रतिभेच्या
वेदींतुन
सखि येशिल तूं--
येशिल तूं !!
येशिल तूं !!

---

# जलाशयांतिल नितळ जलावर—

जलाशयांतिल नितळ जलावर
बिंब सृष्टिचें खुलुनी दिसते
निळ्या बिलोरी पार्श्वभूमिवर
हिरवी वनराजी ही झुलते !!

जलाशयांतिल नितळ जलावर
नील नभांगण झुकलें असतें
स्फ़ीत दर्पणीं वदन निरखण्या
चंद्रकोर झेंपाउन येते !!

जलाशयांतिल नितळ जलावर
तुरळक नौका असती स्थिरचर
उजाडत्या मधु अस्फुट वेळीं
गाती भैरवि पक्षी मंजुळ !!

जलाशयांतिल नितळ जलावर
थवे खगांचे फिरती सत्वर
सूर मारुनी भिजवित अपुले
उडत, पंख हे उभारुनी वर !!

जलाशयाच्या कांठावरती
स्तंभ विजेचे स्थितप्रज्ञापरि
उभे राहुनी सदा पहाती
भाव रहित ते वैराग्यापरि !!

जलाशयाच्या जवळुन जेव्हां
लोकल थडथड करीत जाते
झाडावरल्या कोटरांत तंव
दुनिया पक्ष्यांची चिवचिवते ! !
जलाशयांतिल जललहरीवर
मंगल वेळीं दृष्य मनोहर
फुलणाऱ्या या उषःकालचें
भावगीत तें अनुपम सुंदर ! !

---

# सोडतांना सोडवेना—

सोडतांना सोडवेना
तोडतांना तोडवेना
मोडतांना मोडवेना
जिवाभावाचेच बंध !!
सोडतांना सोडवेना
तुझ्या मायेची पाख
सोडतांना सोडवेना
तुझ्या घराचेंच दार !!
सोडतांना तुझें गांव
घोटाळती मागें पाय
सोडतांना तुझी साथ
हेलावुनी मन जाय !!
सोडतांना सोडवेना
रेशमाच्या दीर्घ गांठी
सोडतांना सो वेना
गोड तुझ्या आठवणी !!
सोडतांना सोडवेना
वेड्या मनाचा हा छंद
आळवीन प्रीत तुझी
काव्यांतुनी अनिर्बंध !!

जलाशयाच्या जवळुन जेव्हां
लोकल थडथड करीत जाते
झाडावरल्या कोटरांत तंव
दुनिया पक्ष्यांची चिवचिवते ! !
जलाशयांतिल जललहरीवर
मंगल वेळीं दृष्य मनोहर
फुलणाऱ्या या उषःकालचें
भावगीत तें अनुपम सुंदर ! !

---

# सोडतांना सोडवेना–

सोडतांना सोडवेना
तोडतांना तोडवेना
मोडतांना मोडवेना
जिवाभावाचेच बंध !!
सोडतांना सोडवेना
तुझ्या मायेची पाख
सोडतांना सोडवेना
तुझ्या घराचेंच दार !!
सोडतांना तुझें गांव
घोटाळती मागें पाय
सोडतांना तुझी साथ
हेलावुनी मन जाय !!
सोडतांना सोडवेना
रेशमाच्या दीर्घ गांठी
सोडतांना सो वेना
गोड तुझ्या आठवणी !!
सोडतांना सोडवेना
वेड्या मनाचा हा छंद
आळवीन प्रीत तुझी
काव्यांतुनी अनिर्बंध !!

# ये उजळित ममहृदयीं--

तुडवित ये तम सारें, बिजलीचें गात गीत
ये उजळित मम हृदयीं, आशेची दीपज्योत !!

नैराश्या सार दूर
कंपित जें करित ऊर

चैतन्या उचळित ये, रुद्रवीन झंकारित
ये उजळित मम हृदयीं, आशेची दीपज्योत !!

घोंघावत, झेंपावत
अनिला परि ये नाचत

सांग मना नवबाटा, तुज साऱ्या ज्या माहित
ये उजळित मम हृदयीं, आशेची दीपज्योत

जलदांच्या संथ गतिंत
मयुरापरी ये डोलत

बहुरंगी सुंदरसे मयुरपंख ते उभवित
ये उजळित मम हृदयी, आशेची दीपज्योत !

गाई मधु बहार राग
फुलवि मनीं तू पराग

सौरभ अन् पसर दूर, गंधित करि आसमंत
ये उजळित मम हृदयी आशेची दीपज्योत !!

कवि– म. प्र. पुराणिक

## संमोहन–

स्पर्शसुखाची तव अभिलाषा
जेव्हां आतुर नजर दाविते
मानेवरल्या कचपाशांतुनि
करांगुली तव चपखल फिरते १

जीवनकलिकेवरी फुलविलीं
आजवरी तीं फुलें निमालीं
फुलायचें जर नाशासाठीं
कशास त्यांना पुन्हां फुलविणें ? २

नयनांमधल्या भावतरंगीं
मोहक सूचक परि संमोहन
भुरळ घालतां सहजच मजला
नकळत होतें तुझिया आधिन ३

---

# इतिहासाच्या पर्णांवरतीं--

इतिहासाच्या पर्णांवरतीं
कोष स्मृतींचे वेंचुनि घ्यावें
सुखदुःखांचें मृदुल मुलायम
तलम रेशमी वस्त्र विणावें १

इतिहासाच्या पर्णांवरतीं
साफल्याचें गीत लिहावें
वैफल्याचें अळणी कडवें
जलरंगानें कधीं टिपावें २

इतिहासाच्या पर्णांवरतीं
अनुभूतींचे लेख लिहावे
भावकळ्यांचे गेंद गुलाबी
निज रुधिरानें फुलवित जावें ३

इतिहासाच्या पर्णांवरतीं
भवितव्याचें रूप पहावें
विमल मनाच्या भव्य कल्पना
जगा दाविण्या शिल्प शिकावें ४

---

# " स्थिरलेला जीवभाव "--

सायलीच्या साउलींत
वाहे वारा थंडगार
सुखावतो माझा देह
भारावतें अभ्यंतर

भारावतें अभ्यंतर
तृप्ती भरे कांठोकांठ
विरे त्रिकल भावना
मग स्फुरे सायंगीत २

मग स्फुरे सायंगीत
आशयाचें लेणें घेई
अति त्रिमल कल्पना
तरळून त्यांत जाई ३

तरळून त्यांत जाई
अंतरींचा सुप्त भाव
थिजलेल्या व्यथा मनीं
स्थिरलेला जीवभाव ४

स्थिरलेला जीवभाव
गुणगुणें गायनांत
नसे उणीव उरली
सायलीच्या साउलींत ५

---

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि. ३/१०/५४

# अजून—

अजून येतो मस्त मोगरी
सुगंध तुझिया गौर तनूचा
अजून स्मरतो मधुर मनोरम
स्रोत आगळा रसवंतीचा १
अजून पडतें कानीं हासूं
भास तुझ्या निर्व्याज मनाचा
अजून दिसती विशाल चंचल
नयन जिंकिती मद हरिणांचा २
अजून फुलले गुलाब गालीं
सुखावतो मज बहर तयांचा
अजून होतों धुंद अंतरीं
होतां आठव तव प्रीतीचा ३
अजुन विलोभन सखे, आठवे
सहवासांतिल सुखद स्मृतीचें
अजून नाहीं विरले आणिक
विलास मोहक मधुस्वप्नांचे ४
अजून छेडित बसतों वीणा
आळवीत मी विरह-विराणी
अजून झुरतें मानस माझें
तुझ्याचसाठीं, सखे साजणी ५

---

# सुनिर्मल जलांतली–

सुनिर्मळ जलांतळी सुखद चंद्रिका हांसरी
अथांग जळवाहिनी चमकते रुपेरी वरी
सुगंध अति आगळा दरवळे किनारीं वनीं
प्रशांत समयीं अशा उठति भावउर्मी मनीं १
विशाळ अमरांगणीं जमुनि तारका खेळती
निशेसह निशापती रमुन पाहतो त्यांप्रतीं
अजोड अति रम्य तें बघुनि दृष्य धाले मन
मनांत विरले स्वयें कटु उदासवाणे क्षण २

---

# -दिवास्वप्न-

नीलाकाशीं चांद धावतां
नदी किनारीं नौकेमाजीं
शांत समयिं त्या एकांतामधिं
तूं मस्तानी, मी तव बाजी १

गिरीकंदरीं सागरतीरीं
अथवा जेथें नसेल कोणी
विसरावें मी गमतां अवघ्या
गोड तुझ्या मग सुरेल गानीं २

वसन भरजरी कधीं नसुनी
लचकत मुरडत तूं चालावें
पदन्यास तो अनुलक्षोनी
मीही मोहुन फेर धरावे ३

मस्त मोगरी सुगंध तनुचा
तुझा पसरतां अवघ्या सदनीं
नागफणीसम कधीं डुलावें
तुझीया पुढती धुंद होऊनी ४

हाय ! परंतू नसे विसावा
क्षणभरही ना उसंत ठावा

पोटासाठीं करी भ्रमंती
वणवण फिरतों ठायीठायीं ५

विरल्या आशा, इच्छा साऱ्या
मनांत थिजल्या गाढ सुखाशा
मिळवूं न शके झिजवुनि काया
शिधा रोजचा सखे पुरेसा ६

---

## खुळाच मी—

डोळ्यांना झांपड बांधून
मानेवर जूं घेत
तेल्याचा घाणा
बैलानें ओढावा
वा
पोहऱ्यांची माळ
रहाटावरून गरगरावी
भरावी, रिती व्हावी
पुन्हां भरावी
तसा सारा दिवस
घड्याळाच्या गतीनें, हिशोबानें
तोलून–मापून–मोजून
धाववावा, नी—
गळल्या देहाचं उंसाचं चिपाड
घरीं आणावं ओढून,
जसं मेलं मढं
दारांत पाउल टाकावं जड
तोंच
पत्नीच्या तृप्त नजरेत

गोड मंद स्मितांत

बालांच्या

इवल्या, इवल्या करपाशांत

निर्व्याज मोहक हास्यांत

हलकल्लोळांत—

—तें सजीव होतं

हंसतं, नाचतं

नाचरं नवचैतन्य

दौडत धांवत त्यांत शिरतं

सानुलं, छकुलं कटीखांदीं मिरवतं

नी मनाचं हलकं फूल

उमलतं

खुदकन् हंसतं

पुटपुटतं

बेभान होऊन बरळतं

'खुळाच मी, खुळाच मी'

# ' मी घुसळण घुसळित असतां '

[ या ' पद्मा ' यांच्या कवितेस उत्तर ]

तूं असतां सीता—राधा
    तुज भास रामकृष्णांचे
परि तुझीच तूं असतांना
    पुसशी मम रूप कुणाचें ?
तव रूपें नाना रंगीं
    जीं बहुविध तन्मयतेचीं
निर्मितात शिल्प माझीं
    मखमाली आभासांचीं
मी पण माझें परि गे
    तव रूपांतचि विरघळलें
तुझिया सहवासामधीं
    अद्वैतचि मीं अनुभविलें
तें जीवन वास्तवतेचें
    जें अवध्या सामान्यांचें
मज हवें निरागस साचें
    सहजीवन आनंदाचें

---

श्रीरंग गुर्जे

# आज खुणेची—

आज खुणेची बघुन अंगठी
उठलें मोहळ, आठवणींतिल डंख लागले मागें
कुणितरि जाउन, या तिज घेउन, भिक्षा भूपति मागे ॥धृ॥

पद्मिनीच ती लोभस ललना
मधुपानास्तव तिज छळतांना
संधि सुधेची दिलीस मजला
रसिक रसांतच अविरत रतला
उदार भ्रमरा ! स्फुरत्या अधरा ! मधुरजनी नच रंगे ॥१॥

काव्यांनीं तत्र वाट रोखली
संकोचे लाजुन काचोळी
मुखीं अवेळीं उषा उजळली
फुलें लाजरीं उरीं उमललीं
दिलादिलाचें, युगायुगांचें, जुळले रेशिम धागे ॥२॥

विस्फारुनिया निश्चल नयनें
तिनें मिळवलें तुझें पहाणें

विरह वेदना मम शमवाया
मृगा ! मृगाक्षी जा शोधाया
[१] "उन्नत पुढती, खोल मागुती।" पदावली त्या मार्गें ॥३॥

वनांत पाहुन विशाल नयना
कमल कळ्यांनो ! रोष न माना
जरी म्हणत मी लोचन कलिका
स्पर्शांति सुमना क्षुद्रभाव कां ?
प्रेमच केवळ, अवघा परिमळ, उधळा समिरासंगे ॥४॥

चंद्रकरांतुन, दंवबिन्दूतुन
संवेदकसें घडलें सिंचन
अैकलेंस तें अमुचें हितगुज
—शपथ सख्याची वनज्योत्स्ने [२] ! तुज
दीपासंगे, नृपाळ जागे, वियोग वणवा लागे ॥५॥

वृक्षलतांनो ! सालंकृतशी
दिलीत कन्या तुम्ही षोडशी
कुलशाली ती कुलटा गणली
नाथ असोनी अनाथ केली
शयनमंदिरीं, मासोळीपरि, पुष्करणी ती भंगे ॥६॥

---

१) " अभ्युन्नता पुरस्तात् अवगाढा जघन गौरवान् पश्चात् "

—कालिदास

२) 'वनज्योत्स्ना' या वेलीचें शकुंतलेनें 'सहकार' वृक्षाशीं लग्न लावलें होतें.

दुर्दैवाचा, दुर्वासाचा
शापकाल हा सरला साचा
निरोप सांगा तिजला सत्वर
“ सखि ये क्षणभर; सखि ये क्षणभर
शासन द्याया, क्षमा कराया, रागें वा अनुरागें ” ॥७॥

कुणितरि जाउन या तिज घेउन भिक्षा भूपति मागे ॥

---

# आतां वाटतें

बहरें यौवन, बहरे संगत
गूज आपुलें होतें रंगत
अता वाटतें ( व्यर्थच वाटुन )
त्यांत प्रीतिची होती लज्जत
भांडणांतही होता अनुनय
अबोल्यांतही होता आशय
अता वाटतें ( व्यर्थच वाटुन )
संदेहाचें विश्वहि सुखमय
निरोपसमयीं भरलें लोचन
भावभरें तूं दिली आठवण
अता वाटतें ( व्यर्थच वाटुन )
मधुभावांची त्यांत सांठवण
दूर कुठेंतरी, दुर कुठेंतरी
तुझी थाटली निवास नगरी
अता वाटतें ( व्यर्थच वाटुन )
फुलती उलती भाव अन्तरीं
सहवासीं नच कळते पारख
परी वियोगें लागे रुखरुख
अता वाटतें ( व्यर्थच वाटुन )
दिलादिलांची होती ओळख

"राधिकेस नच दिसलें गोकुळ"
तरंग एकच करितो व्याकुळ
अता वाटतें ( व्यर्थेच वाटुन )
प्रीत नसावी लज्जासंकुल

---

# मोट सोडिचा वखुत जाहला

मोटसोडिचा वखुत जाहला
आकाशामदि फुटें तांबडं
पघूं कितिकदां घरांकडं गं
फुटें न माझं कसं तांबडं ?

नाडा वोढुन शीळ घातली
कानीं आली तुपली चाहुल
घरवाल्याचं चुकवुन डोळं
भाअिर पडलं ' हळदी 'पाउल

धाव सोडुनी आलो जवळीं
कुनी भारलं ? जादू कसली ?
थारोळ्याच्या पान्यामंदी
पघत राहिलो चितरें अपुलीं
"किरीकर कुंअिकुंअि तोंच हळू गं"
मोट बाइनं चुगली केली!
"सळ्सळ् सळ्सळ्" वारं सुटलं
चितरें आणिक मिसळुन गेली

अिचार कसला मनांत घुसला ?
दिठींत आपुल्या कसली घुटमळ ?
ओठ हालतां ननर ढळे कां ?
काळजांत गं कसली खळबळ ?

' सूं सूं सूं सूं ' वारं हसकं
' धो धो ' हसकी ~ोट मोकळी
गोंधळको परि दाठ बोलकी
" कव्हां व्हायची मन मोकळी "

---

# फिरणार न आता–

फिरणार न आतां पुन्हां पाउलें येथं
जाणीव एक ही करिते व्याकुळ चित्त ॥धृ॥
हा दुर्ग तसा हा घुमट उभा, ही भिंत
पायथ्यास खाडी, शेष जसा निद्रिस्त
हा पूल भव्यसा ही वळणाची वाट
हा माथ्यावरला कुंज सानुला शांत ॥१॥

कुंजातुन दिसते गिरिराजी ती रम्य
घरकुलें मागुती, भावविश्व हें भव्य
ती रानें, पुढती झाडि विखुरली वन्य
वाटलें बसावें पहात दृष्य निरन्त ॥२॥

डोंगरीजवळ ती चमचमणारी गाडी
डोकावति मधुनी उभार उंच धुराडी
फडफडे शीड तें, अशी थोरली होडी
चित्तांत चित्र हें रेखायास चिरन्त ॥३॥

येथेंच चोरट्या चळल्या दृष्टादृष्टीं
येथेंच रंगल्या कितीक गांठीभेटीं
मनिं तरंग उठके कधीं सांगता गोष्टीं
अव्यक्त राहिले भाव, बोलुनी जेथं ॥४॥

तुजसंगें येथें गमला वसंत अेक
या नीरव रानीं घुमलीं गीतें मूक
त्या सकलही वेळा उषा भासल्या लाख
उमलकें स्वप्न हें जिथें उभ्या वर्षांत ॥५॥

डोलतां विश्व हें निळ्या रुपेरी स्वप्नीं
या कुंजतलीं अन् असल्या निवांत स्थानीं
आळविलीं असतीं आपण मंजुल गाणीं
विरणार विराणी आज अेकही आर्त ॥६॥

---

## हे जलवन्ति

मेघांच्या नगाऱ्यावर
टिपऱ्या विजेच्या झडल्या
टपटपल्या थेंबातुन
आणला गंधवतीनें
तुझ्या आगमनाचा
घमघमता संदेश.
आलीस तूं
कानोसा घेत, वळसे देत
मान वेळावत, थबकत थरकत
मुरकत मुरडत ठुमकत छुमकत
तुषार तोरणें, फुलवित झुलवित
गर्जत नाचत वेगें झेपावत
आलीस तूं
नयनांत माखून नवतीची किमया
अधरीं लेवुन रंगत लाखिया
आसूसती बाहूं रोमांचे काया
घे लोळण
स्पर्श चरण
फिरुन वळण
या तुझ्या तरंगलीलेंत

या अनंगलीलेंत
गीत मंजुळतें झुळझुळतें
वाटतें कीं—
संगींतीं तुझ्या प्रीतीची हांक
दिठींत तुझ्या मिठाची झांक
हे जलवन्ति ! हे जलवन्ति !

---

ठाणे

# भाव कहाणी

हा पदर कसा गं अवखळ इतुका बाई ?
हं जपून सावर दिसेल कोणा घाई
–" थांबला हात कां ?" " कुंभ कुणास्तव
भरला ?"

पाहिलेस वरती ? करुनी हाच विचार
चमकले चोरटे भाव लोचनीं चार

हा खुलाच होता सकलां जीवनलेख
सुखदुःख बोललों गुपित न कांहीं एक
क्षण एक होउनी अस्थिर नजरा स्थीर
परि पाणवठ्यावर भावकथन जें केलें
का नकळे मी तें कुणास नच कथियलें

दिनरात्रीच्या सुप्रसन्न वातावरणीं
रमतसें एकला देहमान हरपुनी
–सहवास माधुरी प्राशन करतां सखये !
एकल्यास का सुप्रसन्न वातावरणीं
परि अतां लागते अजाणता हुरहुरणीं

थांबरे मयूरा ! दिवस किती हे आता
जाउदे उन्हाळा कसली नच मग चिंता
–वाहतील वारे, साठतील मगमेघ
नाचेल भावना उंचावून पिसारा
अन् तुलाच घे मग पहिल्या वहिल्या धारा

" खदखदला होता पंक विकारी येंथ
लागला परि अंकूर दिनान्तीं तेंथ
  लोटता काळ तें रोप तराऊन फुललें
उमललें प्रीतिचें फूल पांगला गंध
रे धाव मिलिंदा ! चाखाया मकरंद '

हें पत्र तुझें, हा पांच ओळीचा थाट
भरलेंत भाव परि यांतच काठोकांठ
  हें पत्र न, परि हा ग्रंथच तव हृदयाचा
दाखवूं कुणाला ? सांगू कैसे नकळें
ओळींत तुझ्या मम शाकुंतल जें भरलें

घमघमलें मानस कीं मदनाचा कोष !
वाऱ्यावर विहरे काय तुझा संदेश ?
  कमलिनी थांबगें ! घेउन संधिप्रकाश
अवकाशीं अवघा घुमत्रित गुंजन नाद
चाखाया येईन मकरंदाचा स्वाद

गें निवान्त बसुनी निरन्त हितगुज घालूं
मधुभाव मनांतील सकल सखे ते उकलूं
  मी अधीर होउन धीर धरोनि आलों
परि सन्मुख बसतां शब्दहि ये न कुठून
निःशब्द कराया जादुगार वद कोण ?

× × +

उत्फुल्ल फूल तूं भेट म्हणोनी दिधलें
पानांत स्मृतींच्यां आजवरी तें जपलें
उकटलें पान तें आणिक दिसले मजला
पाकळ्या गळाल्या देठ म्लानसा हाय !
हें प्रतीक अपुल्या सहवासाचें काय ?

प्रीतिच्या बुल्बुला ! मार भरारी गगनीं
मारतां भरारी आळव विरहीं गाणीं
ते आर्त बोल घुमतील दिशातुन दाहीं
अन् भाव तयांतील एक जीव जाणील
हत्तार छेडुनी साथ तुला देईल

मावळे न रविहा, सहवासाचा अस्त
अंधार न भरला, विरह परी घनदाट
उजळली न रजनी परि प्रणयाची दुनिया
चमचमति ना तारा आठवणींच्या ज्योती
चंद्रमा न झळके, परी प्रीतिची मूर्ति

तव मूर्ति नच ही तूंच येसि या समया
नयनांनो ! लाजुन लपे न आंतिल किमया
आमंत्रक अधरा ! मंत्र तुझा मज कळला
जाणीव जाळतें आभासाचा खेळ
वाढता विरह अन् हृदय करी व्याकूळ.

भेटलों, बोललों, घालविले क्षण रम्य
मी मनासारखा अर्थ लावला अन्य
परि आज राहिलो स्वप्नमाळ ही हातीं
मधुबोलहि घटलें, घटलें वर्षहि भिन्न
आजला आपुलीं जगें जहालीं भिन्न.

× × ×

हिमगिरी सानुलें भिन्न दिशेनें निघती
काटेवर वाहत वाहत जवळीं येती
भेटती; हांसती थंड, धुकें तें विरतां
भांगती, परी अव्यक्तच अन्तर्भाग
ही अशीच नच कां अपुली जीवनवाग.

---

अनुक्रम 9८३८0
विषय ठी काव्य
क्रमांक 9२ ८८0
नों. दि. 3१७१५५

# अशी झाली भेट

क्षितीजावरील
जाणिवेच्या,
हिंदोळ्यावर
गुलाबी शलकांच्या
नेणिवेतील
दोन भावपांखरें
आंदोलली, डोलली.
हन्त !
कूजन न वालतांच
उडून गेलीं
लाजेनें, भयानें ?
भिन्न दिशांना
—अशी झाली भेट
तुझी नि माझी.

**मधुकर पाठक**

# किनारा

किति काळ पहुडला योग्यासम निःशांत
निःशब्द अचेतन निर्विकार निःसंग
तो आज किनारा चळला ढळली शांति
हृदयांत दाटले आज विवेक तरंग.

किति युगें तयाच्या डोळ्यापुढुनी गेलीं
किति सरल्या रात्रीं कितीक दिनही गेले
किति लाटा आल्या, गेल्या विरुनी जिरुनी
पण शांत पहुडला चरण पसरुनि अपुलें.

कधिं येती लाटा, आदळती कधिं वेगें
कधिं हळूच स्पर्शुनि करिति तयाला जागें
परि कधीं न ढळली शांति उरांतिल त्याच्या
पातलें न कधिं ते मोहक हिरवे धागे.

—पण लाट एक ती आली, मोहक हंसली
अन् क्षणांत त्याची जीवन दृष्टी फसली
ती चरण चुंबिलीं प्रेमें आवेगानें
अनुभूति नविनशी उरांत त्याच्या ठसली.

क्षणिं अंतर सरलें, सरलि दूरता सारी
मधुस्वप्न उमललें त्या ठायीं जरतारी
एकत्व पावलें दोघांचें स्वामित्व
उभविला स्वर्ग नव मखमाली चंदेरी.

—पण फुटली पुळणी, विरली जीवन आशा
त्या मोहक सरल्या मुग्ध मदीर मनीषा
तो रंग निमाला, झाला तो निःसंग
अन् उरांत आतां सलते तीव्र निराशा.

———

# मनांत माझ्या शरद वितळला

मनांत माझ्या शरद वितळला
अवघे तनुकण गेले उजळुन
कोनाकोनांतुनी वाढल्या
दाहि दिशांच्या कक्षा चमकुन.

विशाल झालें क्षितीज भंवती
मर्यादित मज दर्या भासे
समिरासम मी गातां गाणें
मुक्त धरा मज आज गमतसे.

विमुक्त दाही दिशांत माझ्या
आज रंगल्या मधुर भावना
गंगेच्या पात्रांत विहरल्या
अवीट स्वाप्निल सकल कल्पना.

गाऊं लागल्या आज कल्पना
विजयिश्रींचीं स्तोत्रें मंगल
मनिंच्या घुमटामधेहि घुमतो
प्रतिध्वनीचा मधु कोलाहल.

मनांत माझ्या स्वर्ग वितळला
अवघे कणकण गेले उजळुन
मर्यादित मज विश्व भासतें
विशाल झालें माझें 'मी' पण.

———

# आंस

सखि! यावें तूं शुभकाळीं
ध्यास हाच आंस ही
खुळ्या जिवास लागली ॥ धृ ॥

ग्रीष्माचा तप्तदाह
हो असह्य हृदयदाह
ओतित ये, सिंचित ये, जलदांच्या पखाली.

लागली तुझीच ओढ
गात गीत गूढ गोड
ये क्षणांत जीवनांत पाजळीत शर्वरी.

फुलवित ये स्वप्नबाग
छेडित ये भूपराग
आळवीत गीत गोड रम्य उषःकालीं.

पाहतों तुझीच वाट
पाणवले नयनकांठ
आतुरल्या नयनिं सखी! मूर्त तुझी हांसली.

टाकित पद मंद मंद
उधळित ये सुमन गंध
ओतित ये चांदणें भरभरुन ओंजळी
सखि ! यावें तूं शुभकाळीं.

---

# तूं

रणरणलेल्या ऐन दुपारीं
येत असे अवचीत कधीं तूं
गंध फुलांचा उधळित भंवती
स्वप्नासम सखि! येत असे तूं—१

कधीं कधीं होऊन चांदणें
अंधारांतुन येत असे तूं
झुळुक वायुची होउन आणिक
मला सदा फुलवीत असे तूं—२

कधीं प्रीतिचें अमृत होउन
धुंद मला बनवीत असे तूं
त्या मदिरेमधि रंगुन जातां
खट्याळ खोड्या करित असे तूं—३

कधीं बैसलों असतां वाचित
हळूंच मागुनि येत असे तूं
आणि अचानक डोळे झांकुन
सखे! मला सुखवीत असे तूं—४

कधीं बैसतां अबोल होउन
लटकें रागें भरित असे तूं

आणि लाजऱ्या अनुरागानें
कुशींत माझ्या शिरत असे तूं—५

अशीच होतिस, अशीच असशी
खट्याळ आणि गोड सखी तूं
अशी रहा उधळीत चांदणें
होउन माझें गोड स्वप्न तूं—६

———

# असह्य हो

विरुनी गेल्या लांब सावल्या
पुसलीं गेलीं उन्हें कोवळीं
अंधाराची ध्वजा नाचवित
हळूं पातली रजनी काळी—१

चंद्रकोर ती हंसरी अल्लड
कुठें घनांच्या आड लोपली
निजलीं रानें, भिजलीं पानें
सृष्टिसखी निःशांत झोपली—२

गिरिशिखराच्या मंचकावरी
लबाड वारा झोपीं गेला
सळसळता तो गर्द रेशमी
क्षुण्ण जाहला हिरवा शेला—३

नीरवतेला घेउन आली
नील धुक्याची हळवी सोबत
आणि काजवे करूं पाहती
सृष्टिसखीशीं नाजुक खलबत—४

शांत झोपला घाट नदीचा
स्तब्ध जाहली सारी खळबळ

आणि लाजऱ्या अनुरागानें
कुशींत माझ्या शिरत असे तूं—५

अशीच होतिस, अशीच असशी
खट्याळ आणि गोड सखी तूं
अशी रहा उधळीत चांदणें
होउन माझें गोड स्वप्न तूं—६

———

# असह्य हो

विरुनी गेल्या लांब सावल्या
पुसलीं गेलीं उन्हें कोवळीं
अंधाराची ध्वजा नाचवित
हळूं पातली रजनी काळी—१

चंद्रकोर ती हंसरी अल्लड
कुठें घनांच्या आड लोपली
निजलीं रानें, भिजलीं पानें
सृष्टिसखी निःशांत झोपली—२

गिरिशिखराच्या मंचकावरी
लब्बाड वारा झोपीं गेला
सळसळता तो गर्द रेशमी
क्षुण्ण जाहला हिरवा शेला—३

नीरवतेला घेउन आली
नील धुक्याची हळवी सोबत
आणि काजवे करूं पाहती
सृष्टिसखीशीं नाजुक खलबत—४

शांत झोपला घाट नदीचा
स्तब्ध जाहली सारी खळबळ

खिन्न उदासिन मुग्ध आर्तता
हळहळत्या उरीं अेकच कळमळ—५

राहे मनिच्या घुमटामध्यें
अशीच भरुनी मुग्ध आर्तता
असह्य होई सारें जीवन
असह्य हो ही गूढ शांतता—६

— —

# कधीं कधीं

कधीं कधीं मम जळतें आंतुन
उदास हळवे व्याकुळ अंतर
कणाकणांतुन फुलतो आणिक
द्वेषाचा कधीं जळता मंथर—१

कधीं कधीं ते मत्सर वारे
मनांत देती उडवुन गोंधळ
क्षणांत जातें धुकें पसरुनी
अविवेकाचें ओशट ओंगळ—२

कधीं कधीं अंगार उसळतो
नसानसांतुन माझ्या दाहक
उफराटें जग पाहुन भंवती
बधीर होती संज्ञावाहक—३

कधीं कधीं नियतीचे फांसे
पडतां उलटे, भलते सलतें
भावभावना गळती माझ्या
आंत कुठेंतरि दुःख सणकते—४

वैषम्याच्या पायावरती
उभा मनोरा स्वार्थि जगाचा
अर्थामधुनी स्वार्थ शोधणें
हाच एकला ध्यास जगाचा—५

कधीं कधीं तर केवळ फत्तर
दिसती शोभुन 'ताज' भूषणें
स्वयंप्रकाशित हिरे माणकें
हीच जगाची ठरति दूषणें—६

परंतु सारी ही कृत्रिमता
रूप जगाचें काळें भीषण
तप्त विषारी साहुन बोचण
कधीं कधीं हो असह्य जीवन—७

———

# वेडा होइन

अनुक्रम 96360
विभाग 27 काव्य
क्रमांक 92ee9
नों. दि. 31/5/54

कधीं वाटतें असाच जावा
दिवस उन्हानें तापुन रापुन
प्रत्यंगातुनि उधाळित पेरित
अंगाराचा विखार घेउन—१

शीत वायुची झुळुक बनावी
दाहक बोचक असह्य भीषण
वृक्षलतांचें व्हावें जीवन
पर्णाविन तें शुष्क अचेतन—२

पुलाफुलांतिल सौंदर्याची
सजीवतेची व्हावी होळी
सृष्टीमधल्या चैतन्याची
जळून जावी रक्षा काळी—३

सृष्टीचें तें भग्न भयानक
निर्माल्यासम पाहुन जीवन
—माझ्यासम जग होतां सारें
मोद भरें मी वेडा होइन—४

——

# तुझिया चरणीं

संध्याकाळच्या लांब सावल्या
पडतां मार्गांत
सरकतो काटा....अनंत क्षणांचा
पुसला जातो
कोवळ्या उन्हाचा सोनेरी रंग
हळूंच अलगद
आणिक त्यावेळीं
असतें उभी मी दारांत ओकटी
तुझिया मार्गाच्या
गोल वळणाशीं
स्थिरावुन दृष्टी !
दाटला काळोख
भकास भीषण
वाढतें आणिक
उरांत स्पंदन
थरथरतें मन,
तुझ्याच दिशेला
धावतें तुफान !
उठतें काहुर
प्रचंड वादळ

आर्त अंतर्यामीं.
आतुर नयनीं साचती दाटती
तुझ्या त्या स्मृतींचें
मृदु दंवबिन्दु ....
तें
ठिबकते मोतीं
झेलुनिया वक्षीं
उभी मी दारांत
तुझ्या मार्गाकडे
स्थिरावुन दृष्टी !
आणिक दुरुन दिसतां तुझीच
समर्थ पावलें आक्रमितां मार्ग
मनाच्या गाभारीं
शिरतो प्रकाश.
माझ्याच मनींचें
गोड स्वप्न जणूं
येतें तुझ्यासवें
फुलुन बहरून.
वाटतें ओढून
करांच्या पाशांत
घ्यावा चुंबून....शीण दिवसांचा
ओष्ट पाकळ्यांनीं

तुझ्याच गात्रांतला !
माझें हें स्वप्न
माझिया नयनीं
येतें तरळून.....!
हळव्या भावना
स्रवति, झरति
वाटतें वाटतें
काढावे धुवून
तुझीये चरण
अणिक वदावे हळूंच मागुन
तेंच तें साफल्य
तीच सार्थकता
अखेर अखेर
माझेंच जीवन
तुझीया चरणीं
तुझिया चरणीं.

REFBK-0008708
अनुक्रम 96360
विभाग का१०८
क्रमांक 92eeo
नोंद दि. 39/12/14